# अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित मुंबई

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

CIN - U91100MH1998SGC117247

✉ apamvmmm2021@gmail.com Website: www.udyog.mahaswayam.gov.in


जा.क्र. APM/ADM/ 682 /2026-27 दिनांक : 15.10.2026

## : सुचना :

**विषय : वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (IR-I) व गट कर्ज व्याज परतावा योजना (IR- II) अंतर्गत व्याज परताव्याचा दावा सादर करण्यापूर्वी बँक खात्याची पडताळणी व व्यवहार बाऊन्स झाल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

महामंडळाच्या IR-I व IR-II योजनांतर्गत मंजूर व्याज परताव्याची रक्कम लाभार्थ्यांनी पोर्टलवर नोंदविलेल्या बँक खात्यात ॲक्सिस बँकेमार्फत जमा करण्यात येते. बँक खात्याचा चुकीचा तपशील, बंद किंवा निष्क्रिय खाते, अपूर्ण KYC अथवा खात्यावरील निर्बंध यांमुळे व्यवहार अयशस्वी होतो व रक्कम महामंडळास परत जाते. अशा प्रकरणांमध्ये खाते तपशीलांची पुनर्पडताळणी व देयकाची पुनर्प्रक्रिया आवश्यक असल्याने रक्कम प्राप्त होण्यास विलंब होतो. हा विलंब टाळण्यासाठी लाभार्थ्यांनी दावा दाखल करताना पुढील काळजी घ्यावी.

**1. व्याज परताव्याचा दावा सादर करण्यापूर्वी करावयाची पडताळणी**

**1.1.** पोर्टलवरील **'Saving Account Details'** मध्ये नोंदविलेले खातेधारकाचे नाव, संपूर्ण खाते क्रमांक, बँकेचे नाव, शाखा व IFSC कोड अद्ययावत पासबुक किंवा बँक स्टेटमेंटशी जुळत असल्याची खात्री करावी. खाते क्रमांकातील **"0" (शून्य ) अंकाऐवजी इंग्रजी "O"( ओ )हे अक्षर नोंदवू नये.**

**1.2.** व्याज परतावा स्वीकारण्यासाठी नोंदविलेले खाते संबंधित योजनेच्या अटींनुसार ग्राह्य असावे. IR-I अंतर्गत लाभार्थ्याच्या नावाचे व IR-II अंतर्गत मंजूर गट/ संस्थेस लागू असलेले आधार लिंक असलेले खाते नोंदवावे. त्रयस्थ व्यक्ती किंवा एजंटचे खाते नोंदवू नये.

**1.3.** खाते क्रमांक नोंदविताना सर्व अंक व सुरुवातीची शून्य अंक अचूक भरावेत. ATM/डेबिट कार्ड क्रमांक, आधार क्रमांक, ग्राहक क्रमांक किंवा कर्ज खाते क्रमांक चुकून नोंदविलेला नाही, याची खात्री करावी.

**1.4.** संबंधित खाते सक्रिय असून त्यामध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने रक्कम जमा होण्यास कोणताही प्रतिबंध नसल्याची खात्री बँकेकडून करून घ्यावी. खाते निष्क्रिय, गोठविलेले किंवा बंद असल्यास आवश्यक कार्यवाही पूर्ण करावी. खाते बंद असल्यास योजनेनुसार ग्राह्य असलेल्या अन्य सक्रिय खात्याचा तपशील अधिकृत प्रक्रियेद्वारे सादर करावा.

**1.5.** बँकेने मागितलेली KYC कागदपत्रे व अन्य आवश्यक माहिती अद्ययावत ठेवावी. खात्यावर जमा रक्कम किंवा शिल्लक मर्यादा लागू असल्यास अपेक्षित व्याज परताव्याची रक्कम स्वीकारता येईल, याची बँकेकडून खात्री करावी. e-KYC मुदतीत करून घ्यावी.

**1.6.** शाखा बदल, बँक विलीनीकरण किंवा खाते स्थलांतरामुळे खाते क्रमांक अथवा IFSC कोड बदलला असल्यास अद्ययावत तपशील महामंडळाच्या अधिकृत प्रक्रियेद्वारे नोंदवावा. **बँकेतील तपशील बदलल्यामुळे महामंडळाच्या पोर्टलवरील तपशील आपोआप बदलत नाहीत याची नोंद घ्यावी.**

**1.7.** पोर्टलवर मागितलेला बँक खातेपुरावा स्पष्ट व वाचनीय स्वरूपात अपलोड करावा. त्यामध्ये खातेधारकाचे नाव, खाते क्रमांक व IFSC कोड स्पष्ट दिसणे आवश्यक आहे.

**1.8.** अर्ज किंवा दावा अन्य व्यक्तीच्या मदतीने भरला असला तरी अंतिम सादरीकरणापूर्वी सर्व बँक तपशील लाभार्थ्याने स्वतः तपासावेत व योग्य असल्याबाबत खात्री करून घ्यावी.

**1.9.** व्याज परताव्याची रक्कम प्राप्त होईपर्यंत नोंदणीकृत आधार लिंक बचत खाते सक्रिय ठेवावे. खाते बदलणे आवश्यक असल्यास अधिकृत दुरुस्ती प्रक्रिया पूर्ण करून महामंडळाच्या संकेतस्थळावर अद्ययावत तपशील नोंदविल्याची खात्री करावी.

**2. व्याज परताव्याचा व्यवहार बाऊन्स झाल्यास करावयाची कार्यवाही**

**2.1.** व्यवहार अयशस्वी झाल्याची माहिती प्राप्त झाल्यानंतर अर्ज क्रमांक, दावा क्रमांक, रक्कम, व्यवहार दिनांक, बाऊन्सचे कारण आणि उपलब्ध असल्यास UTR/व्यवहार संदर्भ क्रमांक नोंदवून ठेवावा.

**2.2.** सदर तपशिलासह संबंधित बँक शाखेशी संपर्क साधून रक्कम जमा न होण्याचे नेमके कारण व त्यावर करावयाची कार्यवाही जाणून घ्यावी. संदेशात कारण स्पष्ट नसल्यास बँकेकडून आवश्यक स्पष्टीकरण प्राप्त करावे.

**2.3.** बाऊन्सच्या कारणानुसार पुढील कार्यवाही करावी:

| बाऊन्सचे कारण | लाभार्थ्याने करावयाची कार्यवाही |
|---|---|
| चुकीचा खाते क्रमांक किंवा IFSC कोड | बँकेकडून अचूक तपशील प्राप्त करून महामंडळाच्या टिकिट जनरेशनच्या अधिकृत प्रक्रियेद्वारे दुरुस्तीसाठी अर्ज सादर करावा. |
| बंद खाते | योजनेनुसार ग्राह्य असलेल्या सक्रिय खात्याचा तपशील व आवश्यक खातेपुरावा सादर करावा. |
| निष्क्रिय खाते, KYC अपूर्ण किंवा व्यवहावरील निर्बंध | बँकेकडील आवश्यक दस्तावेजाची पूर्तता करून खाते रक्कम स्वीकारण्यास सक्षम झाल्याची खात्री करावी. |
| खातेधारकाच्या नावातील किंवा ओळखीतील विसंगती | बँकेच्या नोंदीतील नाव व खाते तपशील पडताळून आवश्यक दुरुस्ती किंवा बँकेचे प्रमाणित स्पष्टीकरण सादर करावे. |
| व्यवहार थांबविलेला किंवा कारण अस्पष्ट | बँक व आपल्या जिल्ह्यातील महामंडळाचे जिल्हा समन्वयक यांच्याकडून कारण स्पष्ट करून घेऊन त्यानुसार कार्यवाही करावी. |
| दुबार देयक,रक्कम मर्यादा किंवा मंजूर रकमेबाबत संदेश | आपल्या जिल्ह्याच्या समन्वयकास माहिती द्यावी. महामंडळाच्या पडताळणी व सूचनेनुसार पुढील कार्यवाही करावी. |

**2.4.** बाऊन्सचे कारण चुकीचा IFSC कोड, चुकीचा खाते क्रमांक किंवा खाते बदलाशी संबंधित असल्यास लाभार्थ्याने महामंडळाच्या पोर्टलवर **तिकीट जनरेट करून बँक खाते तपशील अद्ययावत करण्यासाठी अर्ज सादर करावा.** अर्जासोबत अद्ययावत खाते तपशील दर्शविणारी आवश्यक कागदपत्रे ( धनादेश स्कॅन प्रत ) अपलोड करावीत. अर्ज व कागदपत्रांची पडताळणी करून मान्यता मिळाल्यानंतर बँक खाते तपशील अद्ययावत करण्यास मान्यता देण्यात येतील.

खाते तपशील अचूक असूनही KYC, खाते निष्क्रियता किंवा बँकेच्या निर्बंधांमुळे व्यवहार बाऊन्स झाला असल्यास प्रथम बँकेकडील अडचण दूर करावी.

आवश्यक पडताळणी व मान्यता पूर्ण झाल्यानंतर संबंधित बाऊन्स झालेले व्याज परताव्याचे दावे महामंडळामार्फत पुनश्च देयक प्रक्रियेसाठी सादर करण्यात येतील. देयक प्रक्रिया पूर्ण झाल्यावर मंजूर रक्कम लाभार्थ्याच्या पडताळणी झालेल्या बँक खात्यात वर्ग करण्यात येईल.

**2.5.** अर्ज व कागदपत्रे सादर करताना अर्ज क्रमांक आणि संबंधित बाऊन्स झालेल्या दाव्याचा क्रमांक स्पष्ट नमूद करावा.

**2.6. केवळ व्यवहार बाऊन्स झाल्यामुळे त्याच कालावधीचा नवीन किंवा दुबार दावा स्वतःहून सादर करू नये.** संबंधित दाव्याच्या पुनर्प्रक्रियेसाठी महामंडळाच्या सूचनांचे पालन करावे.

**2.7.** खाते तपशीलांची दुरुस्ती केल्यानंतर पुनर्पडताळणी व आवश्यक मंजुरी पूर्ण होणे आवश्यक आहे. **केवळ दुरुस्तीचा अर्ज किंवा तिकीट सादर केल्यामुळे रक्कम तत्काळ जमा होईल, असे गृहीत धरू नये.**

**2.8.** पुनर्प्रक्रियेनंतर रक्कम जमा झाल्याची खात्री अद्ययावत बँक स्टेटमेंटमधून करावी. रक्कम प्राप्त न झाल्यास आपल्या लॉगीन मार्फत तपशील घ्यावा अथवा आवश्यक असल्यास अर्ज क्रमांक, दावा क्रमांक, तिकीट क्रमांक व उपलब्ध व्यवहार संदर्भासह संबंधित जिल्हा समन्वयकाशी संपर्क साधावा.

<u>3. आवश्यक दक्षता</u>

**3.1.** बँक खाते तपशीलातील दुरुस्ती व दाव्याच्या पुनर्प्रक्रियेसाठी महामंडळाच्या अधिकृत पोर्टलचा वापर करावा. अडचण आल्यास संबंधित जिल्हा समन्वयकाचे मार्गदर्शन घ्यावे.

**3.2.** OTP, पोर्टलचा पासवर्ड, ATM/डेबिट कार्डचा PIN किंवा CVV कोणत्याही व्यक्तीस देऊ नये तसेच LOI नुतनीकरण सेवा वगळता महामंडळाच्या सर्व सेवा ह्या निशुल्क असल्याने कोणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.

**लाभार्थ्यांनी प्रत्येक दावा सादर करण्यापूर्वी बँक खात्याचा तपशील अचूक व अद्ययावत असल्याची आणि खाते रक्कम स्वीकारण्यास सक्षम असल्याची खात्री करावी. व्यवहार बाऊन्स झाल्यास त्याचे कारण दूर करून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता तातडीने करावी व महामंडळाच्या अधिकृत प्रक्रियेचे पालन करावे.**

**आदेशानुसार/-**
**अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ**
**मर्या. मुंबई- 01.**